माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग
## संचालनालय, लेखा व कोषागारे,

मुंबई पोर्ट ट्रस्ट, ठाकरसी हाऊस, तिसरा मजला,
शुरजी वल्लभदास मार्ग, बॅलार्ड इस्टेट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
ईमेल :-aao.hrms@mahakosh.in संकेत स्थळ :- www.mahakosh.in

क्र/संलेको/०१-२०२०/प्रशा-सलेअ-राप/न.क्र.१२३/प्रशा बदली-२०१९/बदली/१३१ दि. 30 JAN 2020

**विषय :- महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहाय्यक लेखा अधिकारी गट ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकारी यांच्या बदलीबाबत.**

**संदर्भ:- १) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५.**

**२) शासन निर्णय वित्त विभाग क्र.संकिर्ण-२०१४/प्र.क्र.१३१/कोषा प्रशा-३, दि.३०/५/२०१५.**

**३) संचालनालयाचे आदेश क्र.संलेको/०५-२०१९/प्रशा.अराप/न.क्र.१२३/सअ-१/ प्रशासकीय बदली-२०१९/३६५, दि. २९/०५/२०१९.**

**४) बारामती नगरपरिषद, बारामती, पुणे यांचे पत्र जा.क्र.बानप-कार्या/२/२४१३/ २०१९, दि. ३०/१२/२०१९.**

## आदेश

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहाय्यक लेखा अधिकारी गट ब (राजपत्रित) संवर्गातील खालील नमूद अधिकारी यांची संदर्भ क्र. ३ वरील आदेशान्वये प्रशासकीय बदलीने पदस्थापना करण्यात आली होती. सुधारित आकृतीबंधानुसार बारामती नगरपरिषद कार्यालयातील आस्थापनेवर संचालनालय, नगर विकास प्रशासन यांचे स्तरावरुन महाराष्ट्र राज्य नगरपरिषद संवर्गातील कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याने सहाय्यक लेखा अधिकारी या पदावर कार्यरत अधिकारी अतिरीक्त होत असल्याबाबत संदर्भ क्र. ४ वरील पत्रान्वये कळविण्यात आले आहे. यास्तव सदरील अतिरीक्त ठरत असलेल्या सहाय्यक लेखा अधिकारी यांना बदलीने इतरत्र पदस्थापना देणे आवश्यक ठरते.

शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील तरतूदींनुसार व संदर्भ क्र. २ मधील शासन निर्णयान्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहाय्यक लेखा अधिकारी गट-ब (राजपत्रित) संवर्गातील कार्यरत असलेल्या खालील विवरणपत्रातील स्तंभ क्र. २ मध्ये नमूद

अधिकाऱ्यांची स्तंभ क्र. ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर प्रशासकीय कारणास्तव बदली करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव पदनाम व कार्यरत कार्यालय | बदली करण्यात येत असलेले पद, कार्यालय व ठिकाण | रकाना क्र.३ मधील पद उपलब्ध होण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री. राजेंद्र शिवाजी इंगळे, सहाय्यक लेखा अधिकारी, बारामती नगरपरिषद, बारामती, पुणे. | सहाय्यक लेखा अधिकारी, पोलिस महानिरिक्षक, राज्य राखीव पोलिस बल, पुणे. | रिक्त पद |

हे आदेश तात्काळ अंमलात येतील.

उपरोक्त नमुद अधिकाऱ्यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ हजर व्हावे व तसे संचालनालयास अवगत करावे.

संबंधित अधिकाऱ्यांच्या सध्याच्या पदावरील तसेच बदलीच्या पदावरील कार्यालय प्रमुखांना विनंती करण्यात येते की, सदर आदेश संचालनालयाच्या www.mahakosh.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असल्यामुळे सदर आदेशाच्या अनुषंगाने उपरोक्त अधिकाऱ्यांना कार्यमुक्त व रुजू करुन घेण्यासाठी संकेतस्थळावरील प्रत ग्राहय धरण्यात यावी.

(ज. र. मेनन)
संचालक, लेखा व कोषागारे,
संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत अग्रेषित :-
१) अवर सचिव (कोषा प्रशा.३), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
२) कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, पुणे.
३) संबधित कर्मचाऱ्यांचे सध्याच्या पदावरील कार्यालय प्रमुख.
४) संबधित कर्मचाऱ्यांचे नियुक्तीच्या पदावरील कार्यालय प्रमुख.
५) संबंधित कर्मचारी.
६) संबधित कर्मचाऱ्यांची वैयक्तिक नस्ती.
७) निवड नस्ती.